**नियमीत दिवाणी दावा क्र. ४२३/२०१५ मधील नि. क्र.४५ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ ते ६ यानी त्यांच्याविरुध्द म्हणणे असा निशाणी ५ आणि ७ चे अर्जावर झालेला आदेश रद्द करुन मिळावा म्हणून मागणी केलेली आहे. त्यांनी म्हणणे देण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. त्यामुळे तजवीज करुन मुदतीत म्हणणे दाखल करता आले नही. त्यामुळे म्हणणे नाही असा पारीत केलेला आदेश रद्द करुन त्यांना संधी मिळावी अशी त्याची मागणी आहे.

२. सदर अर्जाला वादीने म्हणणे देऊन हरकत घेतलेली आहे. अर्जात नमूद कारणे ही खोटी व लबाडीची आहेत. प्रतिवादी सदर शेतकरी असून नोकरीही करतात. त्यामुळे केवळ कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी उशीर माफीचा अर्ज देऊन आणि दरम्याने काळात बांधकाम पुर्ण करुन वादीचा हक्क जाणूनबुजून डावलेलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा. पर्यायाने अर्ज मंजूर केल्यास जास्तीत जास्त खर्च बसवण्यात यावा अशी वादीची मागणी आहे.

३. पुढील मुद्दा माझे विचाराधीन आहे. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत मी पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादींविरुध्द पारीत झालेला म्हणणे नाही असा आदेश रद्द होऊन त्यांना म्हणणे देण्यास संधी देणे आवश्यक आहे काय ? | ...होय. |
| २. | कोणता आदेश? | .. अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजूर. |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र. १ व २ बाबत :**

४. मी अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जातील कारणांचा विचार करता आणि प्रतिवादीची हरकत विचारात घेता म्हणणे दाखल करण्यास प्रतिवादी यांना जो विलंब झाला आहे त्यामुळे वादीला गैरसोय झाली अशी वादीचे कथन आहे. परंतु वादीने पर्यायी खर्चाची मागणी केलेली आहे. प्रतिवादी यांनी अर्जाचे पुष्टयर्थ शपथपत्र दिलेले आहे. त्यामुळे अर्जात नमूद कारणांचा विचारा करता खर्च देऊन

अर्ज मंजूर करता येईल. त्यामुळे गुणदोषावर निर्णय करण्यास सहज सोपे जाईल. वादीला कोणतीही अपरिमित हानी होणार नाही. वाद प्रकरणाचा निर्णय योग्य अयोग्यतेचा विचार करुन गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे मी वरील मुद्दयाला होकारार्थी निष्कर्ष नोंदतो आणि पुढील आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

१. प्रतिवादी यांनी वादीला रक्कम रु.३००/– एवढा खर्च देण्याचे अटीवर म्हणणे आणि कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. आदेशाची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी यांची कैफियत आणि म्हणणे अभिलेखावर स्वीकारण्यात येईल.

ठिकाण : कराड

दिनांक : २९/०७/२०१७.

**(आ. म. सामंत)**

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर ),कराड